# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. अशोक शिवराम रानडे

### मु. पो. नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी



- आंबा लागवडीचा सुमारे २५ वर्षाचा अनुभव.
- सेंद्रिय पध्दतीने आंबा लागवड.
- गांडूळ खत, बायोडायनॅमिक कंपोस्ट, दशपर्णी अर्क, ॲमिनो ॲसिड व फळमाशी नियंत्रण कामगंध सापळा यांचा प्रामुख्याने वापर.
- जांभ्या खडकामध्ये आंब्याची सघन पध्दतीने लागवड.
- स्वतःची मँगो पल्प कॅनिंग फॅक्टरी व बर्फ निर्मिती कारखाना. (मासळीसाठी)

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. सुर्यकांत महादेव देऊलकर

### मु. पो. भेडशी, ता. दोडा मार्ग, जि. सिंधुदूर्ग



- सन १९८६ मध्ये दोडामार्ग तालुक्यात सर्वात प्रथम काजू कलमांची लागवड.
- काजू, केळी व बांबू या पिकांची लागवड.
- कुंपणाला गिरीपुष्पाची लागवड - काजूसाठी सेंद्रिय खत म्हणून वापर.
- फलोत्पादनाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सिंधुदूर्ग ॲग्रो फोरम या स्वयंसेवी संस्थेची स्थापना.
- दुध उत्पादन व रेशीम शेती हे शेतीपूरक व्यवसाय.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. विजय गिरधारीलाल चांडक

### मु. पो. गोंदूर, ता. जि. धुळे



- माळरान व हलक्या प्रतीच्या जमीनीवर सिताफळ, बोर, चिंच, आवळा, आंबा, शेवगा, रामफळ व बांबू या पिकांची लागवड.
- ठिंबक व तुषार सिंचनाव्दारे पाण्याचे सुयोग्य नियोजन.
- उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने सेंद्रिय व जैविक पध्दतीचा अवलंब.
- शेतीला पूरक कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन व कृषि पर्यटन यांचा अवलंब.
- मजुरांचे आरोग्य, सामाजिक वनीकरण, व्यसनमुक्ती इ. सामाजिक कार्य.
- कृषिविषयक पुस्तकांचा मोठा संग्रह.
- शेतावर बायोगॅस, सोलर शेगडी व सौरदिवे वापर व प्रचार.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. वसंत कचरु आहेर

### मु. पो. मुखेड, ता. येवला, जि. नाशिक



- राजापुरी, दसेरा, बलसाड, गुजरात, लंगडा, केशर, बदाम, पायरी, हापूस व इतर १२-१३ आंबा जातींची लागवड.
- कृषि व संबंधित क्षेत्राच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य केल्यामुळे पंजाबराव देशमुख मेमोरियल कृषि पुरस्कार.
- बागेतील जास्त वजनाची व मोठ्या आकाराची आंबा फळे हा परिसरात चर्चेचा विषय.
- २.५ किलो वजनाच्या आंबा फळाचे केंद्रिय कृषि मंत्र्याकडून कौतुक.
- फळपिकासाठी सेंद्रिय पध्दतीचा वापर.
- दुष्काळी स्थितीचा सामना करण्यासाठी कृषि विद्यापीठामध्ये जाऊन शेती तंत्रज्ञानाची माहिती घेऊन पाण्याची टंचाई, अल्प क्षेत्र, भांडवलाचा अभाव या समस्येवर उपाय असणा-या आंबा पिकाची लागवड.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. साहेबराव बाळाजी लांडगे

### मु. पो. वडगाव लांडगा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर



- सन १९८२ साली महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी येथील गणेश या डाळिंब जातीची प्रथमतः लागवड तसेच आरक्ता व भगवा डाळिंब जातींची लागवड.
- सन १९९० पासून पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा वापर.
- युरोप व अरब राष्ट्रामध्ये चांगल्या प्रतीची डाळिंब फळे निर्यात.
- कृषि विज्ञान मंडळाची स्थापना करण्यामध्ये पुढाकार व त्यामार्फत शेतीशाळा, चर्चासत्रांचे आयोजन व कृषि विद्यापीठ तसेच खाजगी क्षेत्रातील तज्ञांच्या मार्गदर्शनाची उपलब्धता.
- दै. सकाळ, ॲग्रोवन व अन्नदाता मासिकातून त्यांच्या शेती क्षेत्रातील कामाची दखल.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. विठ्ठलराव आबासाहेब कडू पाटील

### मु. पो. सात्रळ, ता. राहूरी, जि. अहमदनगर



- पडिक व खडकाळ जमीनीमध्ये बाहेरुन माती आणून संपूर्ण क्षेत्रामध्ये डाळिंब फळबाग लागवड.
- सौरउर्जेचा शेतीसाठी व घरगुती वापर, गोबरगॅस, गांडूळखत, रेन वॉटर हारवेस्टींग, रॅपींग मशीन, ठिबक व तुषार सिंचन, सिंचनाद्वारे मायक्रोन्युट्रियन्टचा वापर, दशपर्णी अर्क वापर इ. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
- परिसरातील शेतक-यांना खडकाळ जमिनीत डाळिंब फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन.
- प्रतवारी व आधुनिक पॅकींग करुन उत्पादनाची विक्री.
- संगणक व इंटरनेटद्वारे रोजच्या बाजारभावानुसार फळपिकांची विक्री.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. बाबासाहेब बाबूराव सस्ते

### मु. पो. कुरवली खुर्द, ता. फलटण, जि. सातारा



- माळरानावर खडक फोडून टप्प्याटप्प्याने डाळिंब व द्राक्ष लागवड.
- पाण्याची कमी उपलब्धता असल्याने ठिबक सिंचनाचा वापर, आच्छादन व सामूहिक शेततळयाचा अवलंब.
- उच्च प्रतीचे डाळिंब व द्राक्ष पिकाची निर्मिती करुन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, अपेडा, कृषि उत्पन्न बाजार समिती यांचेमार्फत आखाती देश, थायलंड, जर्मनी, इराण व मस्कत या देशात निर्यात.
- डाळिंबाचे विक्रमी उत्पादन काढून निर्यात करुन परिसरातील शेतक-यांसमोर आदर्श निर्माण केल्याबद्दल मा. केंद्रिय कृषि मंत्री यांचे हस्ते सत्कार.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. सुमीत सदाशिव धाकोजी

### मु. पो. वडयाची वाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर



- एकूण ०.२५ हे. मध्ये हरितगृहाची उभारणी करून जरबेराची लागवड.
- व्हर्मीवॉश व गांडूळखताबरोबर ॲझोटोबॅक्टर, रायझोबियम, पीएसबी, ट्रायकोडर्मा या जैविक खताचा वापर.
- जरबेरा फुलांच्या पॅकिंगसाठी पॅकिंग- ग्रेडिंग शेडची निर्मीती.
- हरीतगृहामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब.
- हरीतगृह संदर्भात १५ पुस्तके असून, कृषिमित्र, फ्लोरीकल्चर टुडे इ. मासिकांचा नियमितपणे वापर.
- हरीतगृह फुलशेती करणा-या ७ शेतक-यांच्या गटाची स्थापना.
- विविध स्तरावरील पुष्प प्रदर्शने, चर्चासत्रे, व्याख्याने, दूरदर्शन वरील कार्यक्रम यामध्ये सक्रिय सहभाग.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. भगवान आसाराम डोंगरे

### मु. पो. सावरगाव हडप, ता. जि. जालना



- मोसंबी, चिकू, डाळिंब, आंबा, सिताफळ, आवळा, भाजीपाला व मसाला पिके लागवड.
- पाण्याचे सुयोग्य नियोजन करणेसाठी ठिबक व तुषार सिंचन पध्दतीचा वापर, सामूहिक शेततळे, कंटूर बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, आच्छादन तंत्रज्ञान, केओलीनसारख्या बाष्परोधकाचा वापर.
- उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कंपोस्ट खत, हिरवळीचे खत, गांडूळखत, बायोडायनॅमिक कंपोस्ट खत, निंबोळी पेंड, निंबोळी अर्क, व्हर्मीवॉश निर्मिती केंद्र आणि पीएसबी, ट्रायकोडर्मा, ॲझोटोबॅक्टर इ. जिवाणू खतांचा वापर.
- भाजीपाला रोपवाटीकेसाठी शेडनेटचा वापर, रेशीम बालकिटक संगोपन गृहामध्ये रेशीम किटक संगोपन व विक्री, ट्रॅक्टर चलीत कल्टीव्हेटर पेरणी यंत्राचा वापर, एचटीपी पंपाचा वापर, इ. उच्च तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प.
- शेती पूरक व्यवसाय - रेशीम उद्योग व दुग्धव्यवसाय.
- रेशीम शेतीमध्ये विक्रमी रेशीम उत्पादन घेतल्याबद्दल रेशीम मित्र या पुरस्काराने सन्मानित.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. भागवत दिगांबर ठोंबरे

### मु. पो. उंदरी, ता. केज, जि. बीड



- केशर, रत्ना, तोतापूरी, मलगोवा या आंबा वाणांची लागवड.
- साग, लिंबू, पेरु, जांभूळ, सिताफळ, आवळा, शेवगा, नारळ, बदाम व अशोका इ. झाडांची लागवड.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत १०००० घनमीटर क्षमतेचे सामूहिक शेततळे उभारणी.
- पाण्याचे सुयोग्य नियोजन करणेसाठी ठिबक व तुषार सिंचन पध्दतीचा वापर.
- उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कंपोस्ट खत, गांडूळखत, बायोडायनॅमिक कंपोस्ट खत, निंबोळी अर्क, व्हर्मीवॉश निर्मिती केंद्र आणि पीएसबी, ट्रायकोडर्मा, अॅझोटोबॅक्टर इ. जिवाणू खतांचा वापर.
- सेंद्रिय शेती पध्दतीने पिकविलेल्या आंब्याचे ग्रेडींग व पॅकींग करुन थेट ग्राहकास विक्री.
- भाजीपाला रोपवाटिकेसाठी शेडनेट हाऊसचा वापर.
- गांडूळखत कल्चर युनीट, शेडनेट हाऊस, पॅक हाऊस, सुधारीत पध्दतींचा जनावरांचा गोठा, व्हर्मीवॉश, दशपर्णी अर्क व हरीत क्रांती, आंबा नर्सरी इ. उच्च तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्पाची उभारणी.
- महाराष्ट्र ऑरगॅनिक फार्मिग फेडरेशन (मॉफ) चे जिल्हा समन्वयक व बीड जिल्हा फळे, फुले, भाजीपाला उत्पादक खरेदी विक्री संघ मर्या. बीड संघाचे संचालक व जोडधंदा म्हणुन फळरोपवाटीका, शेततळयामध्ये मत्स्यपालन व दुग्धव्यवसाय.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. भानुदास महादजी सवराते

### मु. आलेगाव, पो. कावलगाव, ता. पूर्णा, जि.परभणी



- चिकू, आवळा, आंबा व मोसंबी या फळपिकांची लागवड.
- कमी पाण्यावर, कमी खर्चात, कमी मनुष्यबळामध्ये विकसित केलेली फायदेशीर व भरपूर उत्पन्न देणारी फळबाग.
- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून सामूहिक शेततळ्याची बांधणी.
- गावातील माऊली कृषि विज्ञान मंडळाचे कृषि संघटक असून कृषि विभागामार्फत युरिया ब्रिकेट संयंत्र अनुदानावर घेतले व त्याचा भाडेतत्वावर वापर.
- मोसंबी बागेमध्ये मूग, उडीद, सोयाबीन, गहू इ. आंतरपिके.
- फळांची विक्री थेट नागपूर येथील फळविक्री मार्केटमध्ये.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. शेख ताहेर लाला पटेल

### मु. शेखापूर, पो. सावरगाव, ता. भूम, जि. उस्मानाबाद



- द्राक्षे, अंजीर, चिकू, कागदी लिंबू व नारळ लागवड.
- फळबागेसाठी ठिबक सिंचन, सूक्ष्म मूलद्रव्यांचा वापर, विद्राव्य व सेंद्रिय खतांचा वापर.
- आंबा लागवडीमध्ये मूलस्थानी पध्दतीने लागवड, आच्छादन/बाष्परोधकांचा वापर, जलसंधारणाद्वारे पाणी व्यवस्थापन इ. कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाचा अवलंब.
- अंजीर, द्राक्षे, चिकू या फळपिकांची प्रतवारी व पॅकींग बॉक्समध्ये विक्री तसेच भाडेतत्वावर फळांची साठवणूक करुन ते मूल्यवर्धन.
- शेतातील उत्पादित मालाची स्वतः जाऊन बाजारात विक्री.
- गावातील वृक्ष लागवड, स्वयंसहाय्यता गटांची स्थापना व कृषि विभागामार्फत शेतकरी सहलींचे आयोजनात सक्रिय सहभाग.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. प्रविणकुमार भगवानदास गट्टाणी

### मु. पो. जानेफळ, ता. मेहकर, जि. बुलढाणा



- सेंद्रिय पध्दतीने सिताफळ, आवळा, पेरु यांचे उत्पादन घेवून तयार होणा-या फळांची विक्री स्थानिकरित्या व राज्याबाहेर.
- आंबा पिकांची मूलस्थानी पध्दतीने अभिवृध्दी केली असून दशेरी, केशर, राजापूरी, दुधपेढा, पायरी या वाणांची लागवड.
- उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होण्याच्या दृष्टीने ठिबक सिंचन व तुषार सिंचनाचा वापर.
- आवळ्यापासून पावडर व शॅम्पू, सरबत, मुरंबा व च्यवनप्राश तयार करुन विक्री.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय व ट्रॅक्टरच्या सहाय्याने भाडेतत्वावर शेतीची पेरणी, मळणी इ. कामे.
- फळपिकांची प्रतवारी करुन व विशिष्ट पॅकींग करुन गट्टाणी फार्म या नावाने विक्री.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. रमेश रामचंद्र आकोटकर

### मु. पो. पणज, ता. आकोट, जि. अकोला



- केळी पिक लागवडीमध्ये सुधारीत पध्दतीचा अवलंब, ऊती संवर्धित रोपांचा वापर, शेडनेट हाऊस, सेंद्रिय शेती पध्दती व ठिबक सिंचन अवलंब.
- बायोडायनामिक कंपोस्ट तयार करुन त्यांचा वापर, वनराई बंधारे बांधून जलपुनर्भरण.
- सेंद्रिय केळी उत्पादक गटाची स्थापना.
- श्री. महालक्ष्मी फळ उत्पादक महासंघाची स्थापना आणि शेतक-यांकडुन फक्त दिड टक्के कमिशन आकारुन संपूर्ण देशभर परिसरातील शेतक-यांच्या केळीची विक्री.
- केळी काढणीनंतर प्रतवारी करुन, निर्जंतूकीकरण करुन क्रेटमध्ये पॅकींग आणि महालक्ष्मी केळी, पणज असे स्टिकर लावून विक्री.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. मनोज जानरावजी जवंजाळ

## मु. पो. ता. काटोल, जि. नागपूर



- माहे ऑक्टोबर २००८ मध्ये तेरा मादरे फाऊंडेशन इटली या ठिकाणी सेंद्रिय शेतीच्या सेमिनारमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व.
- संत्रा व मोसंबी फळबाग लागवड.
- शेतामध्ये गांडूळ खत, जीवामृत, आच्छादन, दशपर्णी अर्क व गोमूत्राचा वापर करुन निर्यातक्षम संत्र्याचे उत्पादन कोरोगेटेड दोन डझनाची पेटी तयार केली असून विक्रीसाठी उपलब्ध.
- संत्रा, मोसंबी, फळे व भाजीपाला संस्थेची स्थापना व सचिवपद.
- परिसरातील बागांना भेटी तसेच आकाशवाणीवरुन मार्गदर्शन.
- किसान रोपवाटिकेच्या माध्यमातून सामाजिक वनीकरणामध्ये सक्रिय सहभाग.
- ॲग्रोवन, लोकमत(नागपूर),टाईम्स ऑफ़ इंडिया, देशोन्नती(नागपूर), पुढारी (पुणे), सकाळ (नागपूर) इ. वर्तमानपत्रांतून दखल.
- कृषि विद्यापीठामार्फत सन्मानपत्र व महाविद्यालय शताब्दी महोत्सव २००५ मध्ये फळे व पुष्प प्रदर्शनात संत्र्याला प्रथम क्रमांकाचे बक्षिस.

# उद्यान पंडीत पुरस्कार - २००८

## श्री. किशोर गोविंदराव कन्हेरे

### मु. पो. केतापार, ता. कळमेश्वर, जि. नागपूर



- संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, आवळा, आंबा, गुलाब इत्यादीची लागवड.
- उच्च तंत्रज्ञानावर आधारित सरी वरंभा पध्दतीचा अवलंब करुन गुलाबाची ०.५० हेक्टर क्षेत्रावर लागवड.
- पडिक व डोंगराळ जमीन वहितीखाली तयार करुन उत्कृष्ट प्रकारची मोसंबी/ संत्रा बाग निर्माण.
- गांडूळ कल्चर शेड निर्माण करुन गांडूळ खताचा वापर.
- किड नियंत्रण करण्याकरिता जिवामृत, कडूनिंबाचा अर्क, दशपर्णी, ब्रह्मास्त्र, अग्नीहोत्र याचा वापर.
- आधुनिक तंत्रज्ञान मिळण्याच्या उद्देशाने शेतकरी मासिक, कृषिपत्रिका, बळीराजा व इतर शेतीविषयक मासिकाचा वापर.